# अक्षर वाङ्मय

एप्रिल-मे-जून २०२३

वर्ष : तेरावे अंक : चौथा



संपादक

डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

आर. एन्. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN – 2229-4929
UGC Approved and
Peer Reviewed Journal

# अक्षर वाङ्मय

**वर्ष : तेरावे      अंक : चौथा**

**एप्रिल–मे–जून २०२३**

संपादक
**डॉ. नानासाहेब सूर्यवंशी**

कार्यकारी संपादक
**डॉ. शिवाजीराव देशमुख**

मार्गदर्शक
**डॉ. अरुण प्रभुणे**

संपादक मंडळ

**डॉ. विजय वारकड**
**डॉ. रत्नाकर बेडगे**
**डॉ. दीपक चिद्दरवार**
**डॉ.अंजली मस्करेन्हस**

अमेरिकेतील समन्वयक
**रमेश देशपांडे • किशोर व ब्रिजेट करकेरा • सोनाली जांभेकर**

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन,
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५.
मुद्रक : श्री जे प्रिंटर्स प्रा. लि., १४१६, सदाशिव पेठ, पुणे–४११ ०३०
**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, ता. अहमदपूर
जि. लातूर ४१३५१५. भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com.

**वार्षिक वर्गणी :** रु. ५००/-
**द्विवार्षिक वर्गणी :** रु. ९००/-
**पंचवार्षिक वर्गणी :** रु.२०००/-
**अंकाचे मूल्य :** रु. १२५/-

* महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.
* या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

- २१ व्या शतकातील गोमंतकीय मराठी कवितेचे स्वरूप --------- ७५
  **डॉ. सुनीता उम्रस्कर**
- नितळ व्यक्तिमत्त्वाचे प्रांजळ आत्मकथन- स्मृतिसाद ----------- ८२
  **डॉ. वासुदेव मुलाटे**
- कृषि संस्कृतीच्या यशापयशाचा वेध घेणारा ग्रंथ :
  'शेतकरी जीवनसंघर्ष : ऐतिहासिक परामर्श' ---------------- ८७
  **डॉ. अनंता सूर**
- समकालीनतेचे समर्थ आव्हान पेलणारी कादंबरी ------------- ९१
  **डॉ. किसन माने**
- केशव बा. वसेकर यांची बालकविता-२ ------------------ ९८
  **प्रा.डॉ. मथुताई सावंत**
- मल्लीका सेनगुप्ता आणि सुबोध सरकार बांगला साहित्यातील
  असाधारण दाम्पत्य ------------------------------- १०६
  **ऊर्मिला राघवेंद्र चाकूरकर**
- मराठी वाङ्मयाचे अध्ययन आणि अध्यापनापुढील प्रश्न ------ ११९
  **डॉ. गणपतराव ढेंबरे**
- 'अक्षरवाङ्मय'चे नूतन व नूतनीकरण केलेले वर्गणीदार ------- १२८
- संपादक मंडळ ------------------------------- १३१
- वार्षिक हिशोबपत्र ----------------------------- १३२

# २१ व्या शतकातील गोमंतकीय मराठी कवितेचे स्वरूप

- डॉ. सुनीता उम्रस्कर

मराठी साहित्यविश्वात अभिजात स्वरूपाचा काव्याविष्कार घडविण्यात गोमंतकीय कवीचे फार मोठे योगदान आहे. संतकवी सोहिरोबानाथ आंबिये, कृष्णभट्ट बांदकर, विठ्ठल केरीकर, पुरुषोतम मंगेश लाड, शंकर रामाणी, बा. भ. बोरकर या गोमंतकीय मराठी काव्यक्षेत्रातील नाममुद्राच होत, भक्ती, शृंगार, देशभक्ती, निसर्ग अशा विविधतेने नटलेल्या काव्याविष्कारातून गोमंतकीय कविता समृद्ध झाली. बा. भ. बोरकर यांनी गोमंतकीय निसर्ग आणि गोमंतकीय जीवन यांची सांगड घातली, तर शंकर रामाणी यांनी जीवनाविषयीची आसक्ती कवितेतून साकार केली. थेट सोळाव्या शतकापासून चालत आलेली ही काव्यपरंपरा मराठी साहित्यक्षेत्राचे दालन समृद्ध करणारी आहे.

गोवा मुक्तिपूर्व व गोवा मुक्तीनंतरचा गोमंतकीय इतिहास पाहता अनेक प्रतिकूल परिस्थितीशी गोमंतकीयांना संघर्ष करावा लागला. सांस्कृतिक व धार्मिक परिवर्तन याचा फार मोठा प्रभाव गोमंतकीय सृजनात्मकतेवर असलेला दिसतो. गोमंतकाला भेडसावणारे अनेक प्रश्न आ वासून उभे आहेत. उद्योगव्यवसाय, निसर्ग, स्त्रीजीवन, पूर्वसंस्कारित जीवन, पूर्वपरंपरेचे जतन आणि संवर्धन, अध्यात्म, तत्त्वज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान यासारखे विषय गोमंतकीय लेखक, कवीने अतिशय नेमकेपणाने हाताळलेले दिसतात. विज्ञाननिष्ठ भौतिक जीवनदृष्टी, यंत्रयुग इत्यादींचा प्रभाव आधुनिक दृष्टिकोनावर पडलेला दिसतो. मानवी जीवनमूल्यातील धारणांमध्ये या काळात अनेक परिवर्तने घडली.

२१व्या शतकामध्येच नव्हे तर त्याअगोदरही काव्यलेखन करणाऱ्या कवींमध्ये गोपाळराव मयेकर, नरेंद्र बोडके, सु. म. तडकोड, सुदेश लोटलीकर, पुष्पाग्रज, प्रमोद कारापूरकर, दताराम कासकर, सुरेंद्र शेट्ये, अशोक बोरकर, अनिल

सामंत, प्रकाश क्षीरसागर, चित्रसेन शबाब, शंभू भाऊ बांदेकर, गोविंद नाईक, नारायण खोर्जुवेकर, लक्ष्मण पित्रे, अशोक लोटलीकर, बाळकृष्ण मराठे, आशा मणगुतकर, लीना पेडणेकर, दया मित्रगोत्री, रेखा पौडवाल, कविता बोरकर, तेजश्री प्रभुगावकर, शांता लागू, पौर्णिमा केरकर, राधा भावे, चित्रा क्षीरसागर ही काही कवी व कवयित्रींची नावे होत. तर अलीकडे काही नवोदित कवीही काव्यलेखन करीत आहेत. त्यामध्ये मंगेश हरिजन, साधना आरोदेकर, राधिका नागवेकर, सुश्मिता देसाई इत्यादी युवा कवींची नावे घेता येतात.

कवी सु. म. तडकोड यांच्या 'ताबा' (२००१) हया कवितासंग्रहातील कविता या वेगळ्या भावविश्वाचा आणि मूल्यात्मकतेचा अनुभव देऊन जातात. त्यांच्या कवितेतून जाणवणारी विमनस्कता अनेक शब्दांतून अवतरते. कविच्या अस्वस्थ मनाचा हुंकार कधी कधी इतका आर्त होऊन येतो की त्यावेळी कविची भाषा बदलते. हे जीवन स्थिर स्वरूपाचे आहे. आपल्या भोवतालचे जीवन कितीही बदलले तरी माणसाच्या अंतर्मनामध्ये सलणारे त्यांच्या अस्तित्वाविषयीचे प्रश्न त्यातून जन्मणारी विफलता, अगतिकता त्यामुळे होणारी मनाची घुसमट कधीही न संपणारी आहे. ही आधुनिक संवेदनशीलतेची जाणीव करून देणारी कविता मानवी मनाचा वेध घेणारी आहे. कवी द. वा. तळवणेकर यांचे 'इझम' (२०११), 'पक्षी गगनावरी' (२०१२) या कवितासंग्रहातील कविता सौंदर्यवादाकडे झुकणाऱ्या आहेत. त्यांच्या गझलसदृश्य असणाऱ्या काही कविता वेगळ्या वाटतात. समाजजीवनाचे चित्रण ते करताना दिसतात. उदा. 'मंत्र', 'आभाळ रुसते', 'दिशा हरवल्या', 'असं कसं?' यासारख्या कवितांमधून समाजजीवनातील वास्तव ते मांडताना दिसतात. कवी पुष्पाग्रज यांच्या कवितेत वर्तमानातील आधुनिक जाणीव अवतरते ते प्रेम, निसर्गचित्रे, अध्यात्म ही आशयसूत्रे घेऊनच. काळानुसार बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार माणसाचे प्रश्न, त्याच्या आशाआकांक्षा, त्याच्यातील हेवेदावे, यातून जगण्याचा अर्थ बदलत असतो. संस्कृतीने कालचे प्रश्न सोडविले पण नवे प्रश्न निर्माण केले त्याचे काय? या सगळ्या जाणिवेने आजचा माणूस कोठे जात आहे? ही खंत त्यांच्या कवितेतून व्यक्त होते.

आजचे जग एका वाटेने प्रगतीकडे वाटचाल करीत आहे तर दुसऱ्या वाटेने ते कसे अधोगतीकडे झुकत चालले आहे, याची जाणीव संवेदनशील मनाला

तीव्रतेने होते. कवी नरेंद्र बोडके यांची 'मॉलामॉल' ही कविता या दृष्टीने अतिशय समर्पक आहे. त्यांच्या कवितेतून आधुनिक जीवन दृष्टोत्पत्तीस येते. ते म्हणतात,

'शहरात आलो, मॉलामॉल झालो
आणि सायबरलो
संवादार्थ
एका कोळियाने
नेट जाळियाने
मला पकडले
सांगोपांग
पाहुण्यांसाठी
हा घ्या इ-मेल पत्ता
जरी मी हो स्वता
नाही तिथे
दोन क्लिकांवर

असे म्हणून शेवटी ज्याने अहिंसेचा मार्ग दाखविला त्याची छाप असणाच्या नोटांसाठी आज जग हिंसात्मकतेकडे झुकत चालले आहे हीच या जगाची खरी शोकांतिका आहे, अशी खंत व्यक्त करतात. जागतिकीकरण, नवी अर्थव्यवस्था, नवी मूल्ये विज्ञानाची प्रगती यामुळे आजच्या माणसाचे जग अंतर्बाह्य बदलले आहे याची जाणीव करून देणारी ही कविता आहे.

गोमंतकीय कवयित्रीचे जग हे आत्ममग्न जग असलेले दिसते. गोमंतकियेत्तर कवी इंदिरा संत, शांता शेळके, वसंत बापट, विंदा करंदीकर आदी कवींचा त्यांच्या कवितेवर प्रभाव दिसतो. गोवा राज्य सरकारचा 'यशोदामिनी' पुरस्कार लाभलेली गुलाब वेर्णेकर ह्याचे अंतर (२००४), 'भावस्पर्श', 'मनातले आकाश 'अंबर झुंबर (२०१३) असे कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या कवितांतून हरवून जाण्याचे दुःख, वेदना, विरह, प्रतारणा अशा व्यक्तिगत भावभावनांना गोंजारत असतानाच त्या काही प्रमाणात सामाजिकतेलाही भिडतात. उदा. नेतेगिरी मध्ये त्या राजकीय नेत्यांचे चित्रण करताना दिसतात. 'पैसा', 'तू आणि मी' यामध्ये बदलते जग त्या टिपतात. स्त्रीमनाची घुसमट, व्यथा,

वेदनांचे हे चित्र आहे. ही स्त्री वास्तवापासून वेगळी होत नाही. तिच्या मनाला भिडणारे हे तिचे विश्व आहे. त्यामुळे कदाचित आकाशाला ती गवसणी घालू इच्छित नाही. अवतीभवतीच्या प्रतिमा त्यांच्या काव्यात येतात. उदा. जास्वंदी, गुलमोहर, प्राजक्त इत्यादी.

तुझे भरलेले डोळे
कसे सांगू तुला
रक्ताळलेला गुलमोहर
अजुनी ठिबकतोय

कवयित्री रेखा ठाकूर नंतरच्या कविता यामध्ये आलेली स्त्री ही एक सखी आई आहे. ती भारतीय स्त्री आहे. सोशिक, सात्त्विक पण तितकीच कणखर व सहेली आहे. ती म्हणते-

'देवकीच्या आठव्या पुत्राची वाट पाहणं आता फार झालं
स्वतःच्याच हिमतीवर काही करायला हवं
सूर्य डुबायच्या आधी स्वतःला जागवायला हवं'

अशाप्रकारे आपल्या अस्तित्वाचे भान प्रकट करते.

कवयित्री अनुया शिरोडकर यांच्या 'मन' या कवितासंग्रहामध्ये गोमंतकाच्या निसर्गाची, समाजाची बदलती रूपे पाहता येतात. ती म्हणते,

'सुंदर हिरवा गोवा उसळणाच्या लाटा
कॉंक्रीटच्या जंगलात हरवून गेला
डुलणारी शेते. कुळागरे बागा
हॉटेल, इमारतीला व्यापून गेला
थंड शांत समुद्राचा वारा
रॉक्सच्या मागे धावू लागला
टॉवर्सच्या चढाओढीत समुद्र हसणे विसरून गेला
मायनिंगची धुंदी गोव्याचं आतडं पोखरू लागला
कॅसिनोच्या नशेत धालो मांड विसरून गेला
आंबे काजू, फणसांच्या गऱ्यांऐवजी ड्रग्जमध्ये बुडाला'

गोमंतकीय समाजजाणिवेचा हा आविष्कार कोणाही संवेदनशील गोमंतकियाला अस्वस्थ करणारा आहे.

या कवितांतील स्त्री ही सुशिक्षित आहे. ती स्वतंत्र व निर्भीड आहे. ती पारंपरिक परिधाबाहेर येऊन आपले विश्व धुंडाळणारी आहे. असे असले तरी ही स्त्री अलिप्त राहू इच्छित नाही. ती सगळ्यांना बरोबर घेऊन जाऊ इच्छिते. एकटेपण तिला असहनीय वाटते. ती स्त्री असली तरी ती माणूस आहे व माणसाच्या प्रेमासाठी ती आसुसलेली आहे. हे अनुभव व्यक्त करीत असताना जीवनात तिच्या वाट्याला आलेले भकास जिणं तिला दुःखात लोटणारे आहे. असे असूनही ती सजग आहे. तिचा आशावाद भक्कम आहे म्हणूनच ती स्वतःला सावरून सगळ्यांना आवरू इच्छिते. ह्या स्त्रीचे वेदनेशी असलेले नाते या कवितेतून व्यक्त होते. आयुष्यामध्ये तिला जाणवलेले भकासपण, एकटेपण, अगतिकता यामध्ये ती अधिक मुरलेली आहे. ही स्त्री ही केवळ सखी नव्हे तर स्नेहमय माय होऊन येते. एकटेपणातून निर्माण झालेल्या मनाचे ते आक्रंदन आहे. प्रश्न करून आधुनिक जगातील उपरेपणामुळे त्याच्या मनाला घेरलेले आहे. आधुनिक काळातील अनेक महत्त्वाच्या समस्यांचा मानवी मनावर होणारा परिणाम किती दारुण आहे हे आपल्या कवितेतून या कवयित्री मांडतात.

ह्या गोमंतकीय कवींचा जास्त ओढा हा भावात्मकतेशी, त्यातील संवेदनशीलतेशी अधिक असलेला जाणवतो. रोमँटिक वळणाने जाणारी ही कविता जास्त आत्मपर स्वरूपाची आहे. जीवनाच्या व्यामिश्रतेचा अनुभव देणाऱ्या या कवितेची भाषा आणि संघटना अतिशय साधी आणि सोपी आहे. तिच्या साध्या आणि सोपेपणातूनच ती कविता अर्थगर्भ वाटते. मध्यमवर्गीय सामान्य माणसांचे हे जग आहे. त्यांच्या मनःस्थितीचे हे आकलन आहे.

कोणत्याही साहित्यप्रकारातील आशय व त्यामागील विश्वभान काळाप्रमाणे, संस्कृतीप्रमाणे बदलत जाते. एकंदरीत या कवितांतून कवी आधुनिक माणसाला अस्वस्थ करणाच्या जीवनजाणिवांचा शोध घेताना दिसतो. तरीही जागतिकीकरणाच्या प्रभावाने मानवाची सामाजिक व सांस्कृतिक ओळख अस्पष्ट होत चाललेली असताना समकालीन वास्तवतेचे भान याची प्रकर्षाने जाणीव होण्याची गरज या पिढीला आहे असे वाटते.

जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे इंग्रजी भाषा ही ज्ञानभाषा व संपर्क भाषा म्हणून योजलेली असतानाही या कवितांमध्ये ती क्वचितच येते. संगणकीय परिभाषा, इंग्रजी शब्दांचा वापर, मॉल संस्कृती, बोलीभाषा याचा वापर अगदीच

मोघम स्वरूपात असलेला दिसतो. समाजामध्ये होणारी परिवर्तने ही एकसारखी नसतात. वैश्विक स्तरावर जी आंदोलने झाली त्यामध्ये कृषिक्रांती दरम्यानच्या काव्यातील अलंकार, रूपके इत्यादी सर्व निसर्ग रूपातच दिसत होती तर औद्योगिक क्रांतीमुळे यंत्र आणि यांत्रिकतेशी निगडित प्रतिमा आणि प्रतीके यांचा वापर झाला. या यंत्रयुगामुळे झालेल्या परिवर्तनाचे प्रतिबिंब साहित्यातून पडले. किंबहुना तेच त्याचे साहित्यिक मूल्य ठरले. गोमंतकीय काव्यातून याचे चित्रण अधिक प्रगल्भपणे होणे आवश्यक वाटते. काव्यसंहितेमध्ये चिन्हात्मक भाषेचे महत्त्वपूर्ण योगदान असते. जी काव्यभाषा असते त्यामध्ये इंग्रजी शब्द, संगणकीय शब्द इत्यादींचा उपयोग करणे ही एक काव्यविशेषता ठरते. संगणक, इंटरनेट, ईमेल या सर्व आधुनिक प्रतिमा जीवनाचा अविभाज्य भाग बनलेल्या आहेत. पण केवळ या प्रतिमांमधून काव्य साकारता येत नाही तर कवीच्या मनातील समकालीनसाठी आणि त्याच्या अन्वयार्थासाठी नवी अस्वस्थता व नवा दृष्टिकोन असणे आवश्यक आहे.

ही कविता बव्हंशी स्वच्छंदतावादी जाणिवांतच मग्न असलेली दिसते. गोमंतकीय राजकीय परिवर्तनाचे परिणाम, प्रसार माध्यमांद्वारे प्रकट केलेली वैचारिक क्रांती, वैश्विक, आर्थिक मंदी या संदर्भात ती अलिप्त आहे. या विषयीच्या तीव्र प्रतिक्रिया त्यांच्या कवितांतून उमटत नाही. क्वचितप्रसंगी काही कवीमध्येच ती जाणवते. आपला समाज हा गुलामी, रंगभेद, वर्णभेद, जातिभेद, लिंगभेद अशा वेगवेगळ्या घातक शक्तींविरुद्ध लढा देत असलेला दिसत असला तरी गोमंतकीय कवितेमध्ये त्याचा सूर अतिशय सौम्य दिसतो.

आधुनिक जीवन जाणिवांना सामोरे जात असताना 'स्व'मधून शाश्वत मानवी मूल्यांचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते. तरुण वर्गातील कविता ही तारुण्यसुलभ प्रीतीची हळुवारता तिच्या विविध छटा, प्रेमनिराशा, उदासीनता, खिन्नता अशा भाववृत्तीत अधिक रमणारी आहे. सामाजिक दर्शनाने ती केवळ बेचैन झालेली दिसते. त्यामध्ये आक्रस्ताळेपणा, आक्रमकता, अस्वस्थता दिसत नाही. स्वतःच्या परिसरातील समाजजीवनाशी, त्यांच्या जीवनसंघर्षाशी आर्थिक कारणामुळे उद्भवलेल्या समस्यांशी हया कवींना आस्था आहे, परंतु त्यांचे भावजीवन किती ढवळून निघाले आहे याचा प्रत्यय या कवितांतून येत नाही. अन्य भाषांतील प्रतिभाशाली कवी अशी दृश्ये पाहून उद्ध्वस्त होतात, खवळून उठतात. परंतु

क्वचितच दादू मांदेकरांसारखे ‘श्वापद’ आणि सुदेश लोटलीकरांसारखे ‘कलावंतीण’ यासारखी कविता लिहू शकतात. गोमंतकीय कवी कडव्या जीवनसंघर्षाला क्वचितच भिडतात. संसाराचा गाडा’ ही कविता लिहिणारे कवी अशोक बोरकर निसर्गाच्या सोबतीने झाडा-पेडाच्या, पावसाच्या फुलांच्या सान्निध्यात रमतात. नवकाव्याचे प्रवर्तक बाळ सीताराम मर्ढेकरांनी सांगितलेल्या आत्मनिष्ठेचा शोध या कवितांतून घेणे आवश्यक आहे. वैचारिक आणि आंतरिक कोलाहल अधिक तीव्रतेने अभिव्यक्त होणे आवश्यक आहे.

महानगरीय संस्कृती है आधुनिक मनुष्यसंस्कृतीचे अंशतः प्रतीक आहे. तसेच समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था यांचे चित्र काव्यातून दिसणे साहजिकच आहे. ज्या वेगाने हे चित्र आज बदलत आहे त्याचे चित्रण कवितेतून येणे आवश्यक आहे. गोमंतकीय काव्य हे परंपरा आणि आधुनिकता यांच्या भोवऱ्यात अडकलेले दिसते. यातून बाहेर येऊन आपले एक स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याची गरज आहे. या कवितांमध्ये स्वच्छन्दवाद व आधुनिकतावादाचे मिश्रण दिसते. नव्या मूल्यव्यवस्थेला या काव्याने स्पर्श केलेला आहे, तरीही काळाचे सर्वंकष भान ठेवून त्याचे प्रतिनिधित्व करणे हे महत्त्वाचे ठरते. गतिमान परिस्थितीचे अस्तित्व ओळखून काव्यात व्यक्तिविशिष्टतेपेक्षा आत्मनिष्ठ होऊन काव्य लिहिणे गरजेचे आहे. एका विशिष्ट प्रवाहात अडकण्यापेक्षा आपल्या अवतीभोवतीतील सर्व बंधनांचे पाश तोडून ‘स्व’ मधून प्रकटलेला स्वर काव्यातून व्यक्त होणे महत्त्वाचे आहे.

**डॉ. सुनीता उम्रस्कर**
मराठी विभाग
गोवा विद्यापीठ, गोवा
भ्रमणध्वनी- ९८८१२५६९३३

□□□